


मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करा!

## मालमत्ताकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांचे आदेश

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मालमत्ताकर वसुलीला गती देण्यासाठी थकबाकीदारांविरुद्ध मालमत्ता जप्तीची कठोर कारवाई करा, असे सक्त आदेश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी करसंकलन विभागाला दिले आहेत. चालू आर्थिक वर्षातील वसुलीचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबवावी. करवसुलीच्या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.**

मालमत्ताकराची थकबाकी, जप्तीची कारवाई, मालमत्ता हस्तांतरणाची प्रकरणे, सारथी पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी आणि मागील बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सांडभोर यांनी करसंकलन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेत वसुली वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

महापालिकेच्या अर्थसंकल्पात मालमत्ताकराच्या उत्पन्नाचा मोठा वाटा असतो. याच उत्पन्नातून शहरातील विकासकामे आणि नागरी सुविधांसाठी आर्थिक नियोजन केले जाते. त्यामुळे मालमत्ताकर वसुलीचे निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्व सहायक मंडल अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात नियोजनबद्ध करवसुली मोहीम राबवून उद्दिष्ट साध्य करावे, असे सांडभोर यांनी स्पष्ट केले.

मालमत्ताकर वसुलीत वाढ करण्यासाठी प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील परिस्थितीचा अभ्यास करून प्रभावी उपाययोजना आखाव्यात. करवसुली वाढविण्यासाठी कोणती पावले उचलली जाणार आहेत, याची लेखी माहिती सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. मागील पाच वर्षांतील मालमत्ताकर संकलनाच्या आकडेवारीची तुलना करून चालू वर्षातील वसुलीचा आढावा घेतला जाणार आहे. मागील वर्षांच्या तुलनेत यंदा करवसुलीत अपेक्षित वाढ झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.






थकबाकीदारांकडून कर वसूल करण्यासाठी आवश्यक त्या कठोर उपाययोजना कराव्यात. थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्तीची कारवाई प्रभावीपणे राबवून वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करावे. या कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे सांडभोर यांनी बजावले.

या बैठकीला उपायुक्त सचिन पवार, प्रशासन अधिकारी रश्मी देशपांडे, सहायक मंडल अधिकारी बाळू लोंढे, हनुमंत सरवदे, मनोज शिंदे, अजित नखाते, रणजित भोसले, जयंत मरळीकर, राजेश बांदल, रवींद्र शिंदे, राजेंद्र कुदळे, प्रसाद एच.एस., राकेश सौदे, अतुल काळे, नाना सोनटक्के, निता राणे, डी. डी. गोरडे, हनुमंत मोरे आणि मिलिंद कांबळे आदी उपस्थित होते.

### करवसुलीत दिरंगाई केल्यास कारवाई!

पिंपरी-चिंचवड महापालिकेने मालमत्ताकर वसुलीसाठी कठोर भूमिका घेतली आहे. थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासह वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. प्रत्येक मंडल अधिकाऱ्याला वसुली वाढविण्यासाठी स्वतंत्र उपाययोजना आखून त्याची लेखी माहिती सादर करावी लागणार आहे. कामात हलगर्जीपणा किंवा दिरंगाई आढळल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिला आहे.

# पिंपरीतील ग्रेड सेपरेटरमध्ये कंटेनर अडकला; चालक फरार!

» पिंपरी | प्रतिनिधी

**चिंचवडहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या पिंपरीतील ग्रेड सेपरेटरमध्ये शनिवारी (दि. १७ ऑक्टोबर) पहाटे एक कंटेनर अडकला. कंटेनरच्या धडकेमुळे पुलाच्या स्लॅबचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत असून, या घटनेमुळे परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली. दरम्यान, कंटेनर अडकल्यानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती समोर आली आहे.**

कंटेनर अडकल्याने पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. परिणामी, वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. कंटेनर बाहेर काढण्याचे आव्हान निर्माण झाले असून, पुलाच्या स्लॅबचे नुकसान झाल्याने संरचनेच्या सुरक्षिततेचाही प्रश्न उपस्थित झाला आहे.

पिंपरीतील ग्रेड सेपरेटरमध्ये अवजड आणि निर्धारित उंचीपेक्षा अधिक उंचीची वाहने अडकण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. अशा घटना टाळण्यासाठी प्रवेशद्वारावर उंचीची मर्यादा दर्शविणारे ठळक फलक, उंची प्रतिबंधक यंत्रणा आणि प्रभावी देखरेख असणे आवश्यक आहे. मात्र, पुन्हा एकदा कंटेनर अडकल्याने या उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.





कंटेनरच्या धडकेमुळे पुलाच्या स्लॅबचे नुकसान झाले असल्याने केवळ वाहतूक सुरळीत करणे पुरेसे ठरणार नाही. संबंधित यंत्रणांनी नुकसानीची पाहणी करून पुलाच्या संरचनेची सुरक्षितता तपासणे गरजेचे आहे.

ग्रेड सेपरेटरमध्ये अवजड वाहने अडकण्याच्या घटना वारंवार घडत असताना, त्या रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये संघाचे 50 ठिकाणी विजयादशमी उत्सव!

## २७ ठिकाणी पथसंचलने; १८, २०, २४ आणि २५ ऑक्टोबरला विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे पिंपरी-चिंचवड शहरात यंदा ५० ठिकाणी विजयादशमी शस्त्रपूजन उत्सव, तर २७ ठिकाणी पथसंचलनांचे आयोजन करण्यात आले आहे. १८, २०, २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी शहराच्या विविध भागांत हे कार्यक्रम होणार आहेत. शस्त्रपूजन, शारीरिक प्रात्यक्षिके, घोष प्रात्यक्षिके आणि गीतगायन अशा विविध कार्यक्रमांचा यामध्ये समावेश आहे.**





राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे दरवर्षी विजयादशमीनिमित्त शस्त्रपूजन उत्सवांचे आयोजन केले जाते. यंदा पिंपरी-चिंचवड शहरातही या उत्सवांचे व्यापक नियोजन करण्यात आले आहे. शहरातील विविध भागांत एकूण ५० ठिकाणी शस्त्रपूजन उत्सव होणार असून, त्यापैकी २७ ठिकाणी पथसंचलने काढण्यात येणार आहेत. १८, २०, २४ आणि २५ ऑक्टोबर या दिवशी वेगवेगळ्या परिसरांत कार्यक्रम पार पडतील. या माध्यमातून स्वयंसेवक एकत्र येऊन विजयादशमीचा उत्सव साजरा करणार आहेत.

चिंचवड, पिंपरी, काळेवाडी-रहाटणी, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर, रावेत, आकुर्डी, वाकड, हिंजवडी, ताथवडे, पुनावळे आणि थेरगाव या भागांत उत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर संत तुकारामनगर, सांगवी, पिंपळे गुरव, कासारवाडी, देहू, देहूरोड, चिखली, निगडी, संभाजीनगर, आळंदी, चऱ्होली, दिघी, मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर या भागांतही विविध कार्यक्रम होणार आहेत. शहराच्या वेगवेगळ्या परिसरांतील स्वयंसेवकांना सहभागी होता यावे, यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन केले जात आहे.

विजयादशमी उत्सवांमध्ये पारंपरिक शस्त्रपूजन हा महत्त्वाचा कार्यक्रम असणार आहे. यासोबत स्वयंसेवकांकडून विविध शारीरिक प्रात्यक्षिके सादर केली जातील. घोष पथकांच्या माध्यमातून घोष प्रात्यक्षिकेही होणार आहेत. या सादरीकरणांमधून स्वयंसेवकांचे कौशल्य, शिस्त आणि सामूहिक सहभागाचे दर्शन घडणार आहे. याशिवाय गीतगायनाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमांना विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असून, संघाच्या प्रमुख कार्यकर्त्यांकडून उपस्थितांना मार्गदर्शन केले जाणार आहे. विजयादशमीचे महत्त्व, संघाचे कार्य आणि समाजातील विविध उपक्रम याविषयी या वेळी विचार मांडले जाण्याची अपेक्षा आहे. स्थानिक स्तरावर कार्यक्रमांची तयारी सुरू असून, संबंधित भागांतील स्वयंसेवक आयोजनाची जबाबदारी सांभाळणार आहेत.

शहरातील विविध भागांत आयोजित करण्यात येणाऱ्या या उत्सवांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य आणि सेवाभावी उपक्रम नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. संघाच्या कार्यपद्धतीतील शिस्त, सामूहिक सहभाग आणि समाजासाठी केले जाणारे उपक्रम यांची माहिती या कार्यक्रमांद्वारे दिली जाणार आहे. विविध भागांत होणाऱ्या उत्सवांमुळे स्थानिक नागरिकांनाही कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पिंपरी-चिंचवड जिल्ह्यातील नियोजनानुसार, शस्त्रपूजन उत्सव आणि पथसंचलनांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वयंसेवकांमध्ये समन्वय राखण्यावरही भर दिला जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात ५० ठिकाणी होणाऱ्या विजयादशमी शस्त्रपूजन उत्सवांमध्ये आणि विविध कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड जिल्हा संघचालक विनोद बन्सल यांनी केले आहे. शहरातील विविध भागांत होणाऱ्या या उत्सवांना नागरिकांचा प्रतिसाद मिळावा, यासाठी आयोजकांकडून आवाहन करण्यात येत आहे.

### २७ ठिकाणी निघणार पथसंचलने!

पिंपरी-चिंचवड शहरात विजयादशमी उत्सवांच्या निमित्ताने २७ ठिकाणी पथसंचलनांचे आयोजन करण्यात आले आहे. १८, २०, २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी विविध भागांत होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. शस्त्रपूजन, शारीरिक प्रात्यक्षिके, घोष पथकांचे सादरीकरण आणि गीतगायन हे कार्यक्रमांचे प्रमुख आकर्षण असणार आहे. नागरिकांनी या उत्सवांना उपस्थित राहावे, असे आवाहन संघाचे जिल्हा संघचालक विनोद बन्सल यांनी केले आहे.

# चिंचवडमध्ये नाना पाटेकर, मधू कांबीकर यांच्या स्मृतींना उजाळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

**ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या कलात्मक योगदानासह सामाजिक कार्याच्या आठवणींना उजाळा देत पिंपरी-चिंचवड शहर कलाप्रेमी मंचाच्या वतीने श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली. चिंचवड येथील तारांगण सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कलाकार, साहित्यिक, पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी दोन्ही कलाकारांच्या आठवणी सांगत त्यांच्या कार्याचा गौरव केला. सभेच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री गिरीश प्रभुणे होते.**



या वेळी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, ज्येष्ठ कलावंत वसंत अवसरीकर, लेखक प्रभाकर ओव्हाळ, काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, निहाल पानसरे आणि साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजन लाखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गिरीश प्रभुणे यांनी मधू कांबीकर यांनी कोल्हाटी समाजासाठी केलेल्या कार्याची आठवण सांगितली. समाजातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेल्या मदतीचे महत्त्व अधोरेखित केले. कोल्हाटी समाजातील मुलींनी पारंपरिक नाचगाणी सोडून शिक्षणाकडे वळावे, या उद्देशाने आपण वसतिगृह उभारत असताना मधू कांबीकर यांनी २५ हजार रुपयांची मदत केली होती. त्यांच्या या मदतीमुळे सामाजिक समरसतेच्या कार्याला बळ मिळाले, असे प्रभुणे यांनी सांगितले.

भाऊसाहेब भोईर यांनी कलाकार आपल्या कलेमुळे कायम लोकांच्या स्मरणात राहतात, अशी भावना व्यक्त केली. कलाकाराचे शरीर काळाच्या पडद्याआड गेले, तरी त्याने साकारलेल्या भूमिका आणि केलेले कार्य रसिकांच्या मनात जिवंत राहते, असे त्यांनी नमूद केले.

ज्येष्ठ कलावंत वसंत अवसरीकर यांनी मधू कांबीकर यांच्यासोबत नाटक आणि चित्रपटांत काम करतानाचे अनुभव सांगितले. मधुताईंसोबतच्या आठवणींना उजाळा देतानाच त्यांनी ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांच्या आठवणीही जागवल्या.

पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी नाना पाटेकर यांच्यासोबतच्या भेटीचा प्रसंग सांगितला. नाना हे आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे आणि निर्भीड भूमिकांमुळे वेगळे ठरले, असे त्यांनी नमूद केले. डॉ. श्रीराम लागू यांच्याप्रमाणेच नाना पाटेकर यांनीही विविध सामाजिक आणि राजकीय विषयांवर वेळोवेळी ठाम भूमिका घेतल्या.

### कलाकारांच्या स्मृतींना उजाळा

पत्रकार गोविंद वाकडे यांनी सूत्रसंचालन केले, तर पत्रकार व लेखक विजय जगताप यांनी प्रास्ताविक केले. अविनाश कांबीकर यांनी श्रद्धांजली अर्पण करून सभेचा समारोप केला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अनिल माने, प्रवीण तुपे, अनिस पठाण, विष्णू मांजरे, गणेश दिघे आणि नितीन भोगले यांनी पुढाकार घेतला.या श्रद्धांजली सभेतून दोन्ही कलाकारांच्या कलात्मक योगदानाबरोबरच सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि निर्भीड विचारांचा वारसा जपण्याचा संदेश देण्यात आला.

# दांडियाच्या वादातून राडा;सहा जणांना अटक!

## बौद्धनगरमध्ये दगडफेक, घर-दुकानाची तोडफोड; तरुण जखमी, परस्परविरोधी गुन्हे दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

**मागील वर्षी दांडिया खेळताना झालेल्या वादाचा वचपा काढण्यासाठी दोन गट पुन्हा आमनेसामने आल्याने पिंपरीतील बौद्धनगर परिसरात जोरदार राडा झाला. बुधवारी (दि. १४) रात्री गिरजुबाबा मंदिराजवळ झालेल्या या घटनेत दगडफेक, कोयत्याने हल्ला आणि घरासह दुकानाची तोडफोड करण्यात आली. या हाणामारीत एक तरुण गंभीर जखमी झाला असून, पिंपरी पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल करून सहा जणांना अटक केली आहे.**




या प्रकरणी ३५ वर्षीय महिलेने पिंपरी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार सिद्धार्थ ऊर्फ चिमुकल्या गालफाडे (२०), सुखदेव जेट्टीथोर (२१), प्रतीक अंकुटे (१९), विशाल गालफाडे (२२), अभिषेक व्यंकट कांबळे (१९), गुड्या गालफाडे (२१) आणि दोन अल्पवयीन मुलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुन्या वादातून झालेल्या या प्रकारात संबंधितांनी मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दुसऱ्या प्रकरणात रहाटणी येथील यश बाळासाहेब गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून भगवान नरहरी माने (४८), साहील माने, निखील माने, विकास माने आणि एका ४० वर्षीय महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही गटांकडून परस्परविरोधी तक्रारी करण्यात आल्याने पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या आरोपांची नोंद घेतली आहे. या प्रकरणात नेमकी कोणाची काय भूमिका होती, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

बौद्धनगर परिसरात दरवर्षी दांडियाचे आयोजन केले जाते. मागील वर्षी दांडिया पाहण्यासाठी आलेल्या सिद्धार्थ आणि त्याच्या मित्रांचा भगवान माने यांच्या कुटुंबीयांशी वाद झाला होता. त्यावेळी झालेल्या भांडणातून दोन्ही गटांमध्ये कटुता निर्माण झाली होती. वर्षभरानंतरही हा वाद कायम राहिल्याने यंदाच्या दांडियाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गट पुन्हा आमनेसामने आले. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला; मात्र, त्यानंतर परिस्थिती चिघळून दोन्ही बाजूंकडून मारहाण सुरू झाली. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

हाणामारीदरम्यान दगडफेक करण्यात आली. यामध्ये एका दुकानाची तोडफोड करण्यात आली, तर भगवान माने यांच्या घरातील साहित्याचेही नुकसान झाले. जुन्या वादातून सुरू झालेल्या भांडणाला हिंसक वळण लागल्याने परिसरातील परिस्थिती तणावपूर्ण बनली. सिद्धार्थ आणि त्याच्या मित्रांवर कोयत्याने हल्ला करण्यात आल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे. या हल्ल्यात यश गायकवाड गंभीर जखमी झाले. त्यांना झालेल्या दुखापतीमुळे घटनेचे गांभीर्य वाढले असून, हाणामारीमागील नेमकी कारणे आणि प्रत्येकाची भूमिका तपासातून स्पष्ट होणार आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर पिंपरी पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेत दोन्ही गटांविरोधात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली असून, इतर संबंधितांची भूमिकाही तपासली जात आहे. जुन्या वादातून झालेल्या या हाणामारीत कोयत्याने हल्ला, दगडफेक आणि मालमत्तेची तोडफोड झाल्याने पोलिसांकडून घटनेच्या सर्व बाजूंचा तपास केला जात आहे. परिसरात पुन्हा अशा प्रकारचा वाद होऊ नये, यासाठीही परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

**दांडियाच्या वादाला हिंसक वळण!**

मागील वर्षी दांडिया पाहण्यावरून सुरू झालेला वाद यंदा पुन्हा उफाळून आल्याने बौद्धनगरमध्ये तणाव निर्माण झाला. दोन्ही गटांतील वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. दगडफेक, कोयत्याने हल्ला आणि घर-दुकानाच्या तोडफोडीमुळे परिसरात गोंधळ उडाला. या घटनेत एक तरुण गंभीर जखमी झाला असून, पिंपरी पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल करून सहा जणांना अटक केली आहे.

---

# वायसीएममध्ये स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटर सुरू करा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**संसर्गजन्य जखमा आणि तातडीने शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) स्वतंत्र 'सेप्टिक ऑपरेशन थिएटर' तातडीने सुरू करावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले असून, आवश्यक प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरीसह कालबद्ध कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ४० लाखांच्या घरात पोहोचली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक आरोग्यसेवेवरील ताणही वाढत आहे. शहरातील सर्वसामान्य नागरिक, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वायसीएम रुग्णालय महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे रुग्णालयातील उपचार सुविधा अधिक सक्षम आणि अद्ययावत करण्याची गरज असल्याचे लांडगे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

वायसीएम रुग्णालयात संसर्गजन्य जखमा असलेल्या रुग्णांच्या शस्त्रक्रियांसाठी स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटर उपलब्ध असणे आवश्यक आहे. ही सुविधा नसल्यामुळे काही रुग्णांना उपचारांसाठी अन्य रुग्णालयांत हलवावे लागते किंवा शस्त्रक्रियेसाठी प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे रुग्णांसह त्यांच्या नातेवाइकांना आर्थिक भार आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो. खासगी रुग्णालयांतील उपचार परवडत नसलेल्या कुटुंबांची यामुळे अधिक गैरसोय होते, असे लांडगे यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

संसर्गजन्य जखमा, पूयुक्त जखमा तसेच शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांसाठी स्वतंत्र व्यवस्था उभारल्यास वायसीएम रुग्णालयातच उपचार करणे अधिक सुलभ होईल. त्याचबरोबर संसर्ग नियंत्रणाचे नियम प्रभावीपणे पाळता येतील आणि इतर रुग्णांच्या सुरक्षिततेची काळजी घेणेही शक्य होईल. त्यामुळे या सुविधेला प्राधान्य देण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटर सुरू करण्यासाठी आवश्यक जागा, वैद्यकीय उपकरणे, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि निधी यांचा तातडीने आढावा घ्यावा, अशी मागणी लांडगे यांनी केली आहे. या प्रस्तावाला प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देऊन, राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्यास संबंधित प्रक्रिया त्वरित पूर्ण करावी. तसेच सुविधा सुरू करण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

> "आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही रुग्णाला उपचारांपासून वंचित राहावे लागू नये. वायसीएम हे सर्वसामान्य नागरिकांचे आधारस्थान आहे. संसर्गग्रस्त रुग्णांच्या शस्त्रक्रियांसाठी स्वतंत्र सेप्टिक ऑपरेशन थिएटर सुरू करून त्यांना वेळेत आणि सुरक्षित उपचार मिळावेत, ही आमची आग्रही भूमिका आहे. महापालिका प्रशासनाने आवश्यक निधी, उपकरणे आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करून ही सुविधा प्राधान्याने कार्यान्वित करावी. रुग्णांची धावपळ आणि कुटुंबांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करू."
>
> **–महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# महारेराकडून 369 कोटींची वसुली; पुण्यात 230 कोटी थकीत!

## पुणेकरांना ६८.६३ कोटींचा दिलासा; वसुलीला गती देण्यासाठी विशेष अधिकारी नियुक्त

» पुणे | प्रतिनिधी

**बांधकाम व्यावसायिकांकडून घरखरेदीदारांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) वसुली मोहीम वेगवान केली आहे. राज्यात आतापर्यंत ३६९.४५ कोटी रुपयांची नुकसानभरपाई वसूल करण्यात आली असून, त्यापैकी पुण्यातील ग्राहकांना ६८.६३ कोटी रुपये मिळाले आहेत. मात्र, पुण्यात अद्याप २३०.४५ कोटी रुपयांची नुकसानभरपाई थकीत असल्याने अनेक घरखरेदीदारांना आपल्या हक्काच्या पैशांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.**




महारेराची स्थापना मे २०१७ मध्ये झाल्यापासून १,५३१ तक्रारदारांच्या बाजूने एकूण १,०३७.८६ कोटी रुपयांच्या वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी सुमारे ४५ टक्के रक्कम वसूल झाली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे २६० कोटी रुपये वसूल झाले होते. २०२६ मध्ये आणखी सुमारे ११० कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे.

पुण्यात १७६ प्रकल्पांशी संबंधित ३४५ वसुली आदेशांनुसार २३०.४५ कोटी रुपये देय होते. त्यापैकी ५७ प्रकल्पांमधील १०३ आदेशांद्वारे ६८.६३ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत.

त्यामुळे नुकसानभरपाईचे आदेश मिळूनही पैसे न मिळालेल्या ग्राहकांच्या अडचणी कायम आहेत. उर्वरित रकमेची वसुली कधी होणार, हा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे. जिल्हानिहाय वसुलीत मुंबई उपनगर जिल्हा १४२.३१ कोटी रुपयांसह आघाडीवर आहे. मुंबई शहरात ८५.८० कोटी, पुण्यात ६८.६३ कोटी आणि ठाण्यात ३६.७९ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. बांधकाम व्यावसायिकांनी निर्धारित मुदतीत नुकसानभरपाई न दिल्यास महारेराकडून वसुली वॉरंट जारी केले जाते. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महसूल थकबाकीप्रमाणे वसुलीची प्रक्रिया राबवली जाते. ही प्रक्रिया अधिक वेगवान करण्यासाठी राज्य सरकारने निवासी उपजिल्हाधिकारी आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे वसुलीची जबाबदारी सोपवली आहे.

मात्र, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाकडे (एनसीएलटी) प्रलंबित असलेली १०४.७० कोटी रुपयांची आणि महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण कायद्यांतर्गत येणारी १०४.४६ कोटी रुपयांची प्रकरणे वसुलीतील मोठा अडथळा ठरत आहेत. या प्रकरणांमुळे एकूण २०९.१६ कोटी रुपयांच्या वसुलीवर निर्बंध आहेत. त्यामुळे विशेष अधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतरही थकीत नुकसानभरपाईची वसुली कितपत वेग घेते, याकडे घरखरेदीदारांचे लक्ष लागले आहे.

### आदेश मिळाले, पण पैसे अडकले!

महारेराकडून नुकसानभरपाईचे आदेश मिळूनही अनेक घरखरेदीदारांना प्रत्यक्ष रक्कम मिळालेली नाही. पुण्यातील १७६ प्रकल्पांशी संबंधित २३०.४५ कोटी रुपये अद्याप थकीत आहेत. एनसीएलटीतील प्रकरणे आणि ठेवीदार संरक्षण कायद्यांतर्गत सुरू असलेल्या प्रक्रियांमुळेही वसुलीला मर्यादा येत आहेत. त्यामुळे विशेष अधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर थकीत रक्कम मिळण्याचा मार्ग कितपत मोकळा होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पदवीधर, शिक्षक निवडणुकीत भाजपला राष्ट्रवादीची ताकद!

» पुणे | प्रतिनिधी

**पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपच्या दोन्ही उमेदवारांच्या विजयासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने कंबर कसली आहे. पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिताताई जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारासाठी महायुतीतील दोन्ही पक्ष एकजुटीने काम करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस भवनात झालेल्या समन्वय बैठकीत हा निर्धार करण्यात आला.**



या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, महापौर मंजूषा नागपुरे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांच्यासह भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आजी-माजी आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेत दोन्ही उमेदवारांना विजयी करण्यासाठी परस्पर समन्वयाने काम करण्यावर भर देण्यात आला.

चंद्रकांत पाटील यांनी निवडणुकीसाठी कमी वेळ उपलब्ध असल्याचे सांगत सर्वांनी मानपान आणि नाराजी बाजूला ठेवून एकत्र काम करण्याचे आवाहन केले. डॉ. स्मिता जाधव या उच्चशिक्षित असून, शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. तर कौस्तुभ गावडे हे तरुण आणि अभ्यासू उमेदवार आहेत. त्यामुळे दोन्ही उमेदवारांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी समन्वयाने प्रचार करावा, असे त्यांनी सांगितले.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारात पूर्ण ताकदीने सहभागी होतील, असे स्पष्ट केले. शहर, तालुका आणि ग्रामीण भागासह पाचही जिल्ह्यांत प्रचाराला गती देण्यात येणार आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वानेही याबाबत आवश्यक सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेला शब्द पाळण्यासाठी महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना विजयी करणे आवश्यक असल्याची भावना भरणे यांनी व्यक्त केली. दोन्ही उमेदवारांचा विजय हीच अजित पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही ते म्हणाले.

महायुतीतील कार्यकर्त्यांमधील नाराजी दूर करण्यासाठी आणि प्रचारात एकसंधता राखण्यासाठी दर तीन ते चार महिन्यांनी समन्वय बैठका घेण्याचा प्रस्ताव भरणे यांनी मांडला. तालुकास्तरावरही बैठका घेऊन कार्यकर्त्यांपर्यंत एकजुटीचा संदेश पोहोचवण्यावर भर देण्यात आला. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांनी या प्रस्तावाला अनुमोदन देत भाजपच्या उमेदवारांसाठी पक्षाचे कार्यकर्ते मैदानात उतरतील, असे आश्वासन दिले.

### नाराजी दूर करण्यासाठी तालुकास्तरावर बैठका!

महायुतीतील कार्यकर्त्यांमधील नाराजी दूर करून निवडणुकीच्या प्रचारात एकजूट कायम ठेवण्यासाठी तालुकास्तरावर समन्वय बैठका घेण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवून दोन्ही उमेदवारांच्या विजयासाठी एकत्रित प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला. स्थानिक पातळीवरील मतभेद, मानपान आणि नाराजी बाजूला ठेवून सर्वांनी महायुतीचा धर्म पाळावा, असे आवाहन नेत्यांनी केले.

### अजित पवारांना श्रद्धांजली वाहण्याचा निर्धार!

महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना विजयी करणे, हीच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भूमिका कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मांडली. राष्ट्रवादीचे कार्यकर्ते भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेणार असून, शहरापासून ग्रामीण भागापर्यंत समन्वयाने काम केले जाणार आहे.